MHSO100007792024

## स्पेशल दरखास्त क्र.२५/२०२४ मधील
## निशाणी क्र.२४ खालील आदेश.

हुकूमनामाधारकाने सदरचा अर्ज दिवाणी प्रक्रिया संहिताचे क्रम–२१, नियम–३७(२), ३९(१) अन्वये न्यायनिर्णीत ऋणकोला अटक करुन दिवाणी तुरुंगात ठेवण्यासाठी दिलेला आहे. त्याने सदरचे अर्जात कथन केले आहे की, न्यायनिर्णीत ऋणकोला नि.क्र.०९ च्या आदेशान्वये दिवाणी प्रक्रिया संहिताचे क्रम–२१, नियम–३७ अन्वये नोटीस काढण्यात आलेली होती. सदरची नोटीस बजाविण्यासाठी बेलीफ न्यायनिर्णीत ऋणकोकडे गेले असता त्याने सदरची नोटीस घेण्यास नकार दिलेला आहे. त्यामुळे न्यायनिर्णीत ऋणकोने न्यायालयाचे हुकूमाप्रमाणे वर्तन केलेले नाही व न्यायालयाच्या आदेशाची अवज्ञा केलेली आहे. त्यामुळे त्याला अटक करुन दिवाणी तुरुंगात ठेवण्यासाठी अटक वॉरंट काढण्यासाठी सदरचा अर्ज दिला आहे व तो मंजूर करण्याची विनंती केली आहे.

२. सदरच्या अर्जास न्यायनिर्णीत ऋणको याने नि.क्र.२५ वर जबाब दिला असून त्याने म्हटले आहे की, हुकूमनामाधारकाचा सदरचा अर्ज कायदेशीर नाही. त्याने पुढे म्हटले आहे की, त्याला काढण्यात आलेली दिवाणी प्रक्रिया संहिताचे क्रम–२१, नियम–३७ ची नोटीस कायदेशीर नाही. त्याने नि.क्र.१३ वर त्याचे सविस्तर म्हणणे दाखल केले आहे. त्याचे अवलोकन न करता हुकूमनामाधारकाने सदरचा अर्ज त्याला त्रास देण्यासाठी दाखल केला आहे. हुकूमनामाधारकाने यापुर्वी दिवाणी प्रक्रिया संहितेच्या क्रम–२१, नियम–३० अन्वये नि.क्र.०९ वर अर्ज दिलेला आहे.

त्या अर्जात  न्यायनिर्णीत ऋणकोने नि.क्र.१९ वर सविस्तर म्हणणे देऊन त्याकामी दिवाणी प्रक्रिया संहितेच्या, कलम–४७ अन्वये हरकत घेऊन प्रथम त्याची चौकशीची मागणी केली आहे.

३. मुळ दाव्यात झालेला हुकूमनामा हा रणजितसिंह मोहिते–पाटील यांचे विरुध्द वैयक्तीक झालेला नाही. तो हुकूमनामा शंकर सहकारी साखर कारखान्याच्या विरुध्द झालेला आहे. रणजितसिंह मोहिते–पाटील हे न्यायनिर्णीत ऋणको नाहीत. त्यामुळे ते वैयक्तीक जबाबदार नाहीत. त्यांना दिवाणी प्रक्रिया संहितेच्या क्रम–२१, नियम–३७ चे नोटीसची वैयक्तीक बजावणी झालेली नाही. त्यांनी सदरची नोटीस स्विकारण्यास नकार दिलेला नाही. हुकूमनामाधारकाच्या अर्जातील सर्व कथन खोटे आहे. रणजितसिंह मोहिते–पाटील यांनी न्यायालयाच्या हुकूमाचा कधीही अवमान केलेला नाही. हुकूमनामाधारकाने सदरच्या अर्जात त्याचा प्रतिज्ञालेख केला नाही व अर्जासोबत त्याने शपथपत्र दाखल केले नाही. सदरचा अर्ज हा फक्त त्याचे वकीलांचे स्वाक्षरीने दिलेला आहे. म्हणून शेवटी त्यांनी सदरचा हुकूमनामाधारकाचा अर्ज फेटाळण्यात यावा अशी विनंती केली आहे.

४. वर नमूद केलेल्या कथनांचा विचार करुन माझे विचारार्थ खालील मुद्दे आहेत व त्या मुद्दयावर मी माझे कारणांसह निष्कर्ष नोंदवित आहे.

| | **मुद्दे** | | **निष्कर्ष** |
|---|---|---|---|
| १. | सदरचा अर्ज मंजूर करणे आवश्यक आहे काय? | ... | नाही. |
| २. | आदेश काय ? | ... | अंतिम आदेशाप्रमाणे. |

## कारणमिमांसा

## मुद्दा क्र.१ बाबत

५. मी हुकूमनामाधारकातर्फे विद्वान वकील श्री.भगत व न्यायनिर्णीत ऋणकोतर्फे विद्वान वकील श्री.फडे यांचा युक्तिवाद ऐकला. हुकूमनामाधारकाचे विद्वान वकीलांनी युक्तीवाद केला की, सदरचा हुकूमनामा हा रक्कम वसुलीसाठीचा आहे. त्याप्रमाणे हुकूमनामाधारकाने नि.क्र.९ वर दिवाणी प्रक्रिया संहितेच्या, क्रम–२१, नियम–३० प्रमाणे न्यायनिर्णीत ऋणकोच्या वस्तु जप्त करण्यासाठी व न्यायनिर्णीत ऋणकोचे अध्यक्ष श्री.रणजितसिंह मोहिते–पाटील यांना अटक वॉरंट काढून त्यांना दिवाणी तुरुंगात ठेवण्यासाठी अर्ज दिला होता. तो अर्ज न्यायालयाने मंजूर करुन दिवाणी प्रक्रिया संहिताचे, क्रम–२१, नियम–३७ अन्वये नोटीस पाठविण्याबाबतचा आदेश केला आहे. सदरची नोटीस घेण्यास न्यायनिर्णीत ऋणकोने नकार दिल्यामुळे ती परत आली आहे. अशा प्रकारे न्यायनिर्णीत ऋणकोने न्यायालयाचे हुकूमाप्रमाणे वर्तन केले नाही व न्यायालयाच्या आदेशाची अवज्ञा केली आहे. त्यामुळे न्यायनिर्णीत ऋणकोला अटक करुन दिवाणी तुरुंगात ठेवणे आवश्यक आहे. त्यांनी पुढे युक्तीवाद केला की, महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम, १९६० चे कलम–३६ अन्वये न्यायनिर्णीत ऋणको ही निगम संस्था असून तिचे सर्व अधिकारी तिच्या कृत्यास जबाबदार आहेत. सदरचा दावा हा संस्थेच्या चेअरमन विरुध्द दाखल केला होता. त्यामुळे सदरच्या संस्थेच्या चेअरमनला अटक करुन त्याला दिवाणी तुरुंगात ठेवण्यात यावे.

६. न्यायनिर्णीत ऋणकोच्या विद्वान वकीलांनी युक्तीवाद केला की, त्यांनी दिवाणी प्रक्रिया संहितेच्या, क्रम–२१, नियम–२२ च्या नोटीसला हरकत उपस्थीत केली आहे. त्या हरकतीवर चौकशी झालेली नाही. तसेच हुकूमनामाधारक व न्यायनिर्णीत ऋणको यांच्यामध्ये जो समझोता झाला होता, त्यावर चेअरमनची सही नाही. हुकूमनामाधारकाने सदरची दरखास्त दाखल केल्यानंतर प्रथम जप्ती वॉरंट काढणे

आवश्यक होते. सदरचा हुकूमनामा चेअरमनच्या वैयक्तीक अधिकारात झालेला नाही. त्यामुळे सदरच्या कारखान्याचे चेअरमन श्री.रणजितसिंह मोहिते–पाटील हे न्यायनिर्णीत ऋणको नाहीत. त्यांनी त्यांच्या युक्तीवादाच्या प्रित्यर्थ **"ललीतकुमार रामलाल शर्मा विरुध्द जादवबाई मुरलीधर शर्मा, २००२(२) महाराष्ट्र लॉ जर्नल पान क्र.६४९ (मा.मुंबई उच्च न्यायालय)", "युनियन ऑफ इंडिया विरुध्द इंटरनॅशनल कन्स्ट्रक्शन अॅंड आदर्स, २००२(१) बी.सी.जे., पान क्र.५१३ (मा.सर्वोच्च न्यायालय)" व "शांताराम जी. पिरोलकर विरुध्द एथेलविना कॅलडेरिया अॅंड आदर्स, २००९(५) ऑल.एम.आर., पान क्र.३०६ (मा.मुंबई उच्च न्यायालय)"** या न्यायनिर्णयांचा आधार घेतला आहे. शेवटी, त्यांनी हुकूमनामाधारकाचा अर्ज खर्चासह फेटाळण्याची विनंती केली आहे.

७. मी सदरच्या प्रकरणांमधील संबंधीत दस्तऐवज पाहिले. नि.क्र.२३ वर न्यायनिर्णीत ऋणको म्हणून शंकर सहकारी साखर कारखाना सदाशिवनगर तर्फे रणजितसिंह विजयसिंह मोहिते–पाटील यांना दिवाणी प्रक्रिया संहितेचे, क्रम–२१, नियम–३७ अन्वये पाठविलेल्या नोटीसची प्रत आहे. सदरच्या नोटीसचा अहवाल असा आला आहे की, प्रतिवादी याचा दिलेल्या कार्यालयीन पत्त्यावर सदाशिवनगर येथे जाऊन कार्यालयातील संबंधीत लिपीकाला त्यांच्या शंकर सहकारी साखर कारखाना, सदाशिवनगरचे चेअरमन यांचे नावाची नोटीस घेऊन सही व कार्यालयाचा शिक्का मागितला असता, त्याने त्यास नकार दिला. त्यावेळी सदरचा लिपीक म्हणाला की, कारखान्याचे चेअरमन सदाशिवनगर येथे राहत नाहीत व ते यशवंतनगर, अकलूज येथे राहतात व त्यांना यशवंतनगर, अकलूज येथे जाऊन नोटीस द्या. शंकर सहकारी साखर कारखान्याचे चेअरमन हे दिलेल्या पत्त्यावर राहत नसल्याने सदरची नोटीस न बजाविता परत आलेली आहे.

८. थोडक्यात शंकर सहकारी साखर कारखाना, सदाशिवनगर याचे चेअरमन हे दिलेल्या पत्त्यावर राहत नसल्यामुळे सदरची नोटीस न बजाविता परत

आलेली आहे. सदरची नोटीस रणजितसिंह विजयसिंह मोहिते–पाटील यांनी घेण्यास नकार दिल्याचे अहवालात नमुद नाही. तसेच ते दिलेल्या पत्त्यावर राहत नसल्याचे दिसून येते. त्यामुळे रणजितसिंह मोहिते–पाटील यांनी सदरची नोटीस घेण्यास नकार दिला असे म्हणता येऊ शकत नाही. त्यामुळे त्यांनी न्यायालयाचे हुकूमाप्रमाणे वर्तन केले नाही व न्यायालयाच्या आदेशाची अवज्ञा केली आहे, असे म्हणता येणार नाही.

९. न्यायनिर्णीत ऋणकोच्या विद्वान वकीलांनी युक्तीवाद केला आहे की, रणजितसिंह मोहिते–पाटील हे न्यायनिर्णीत ऋणको नाहीत. त्यामुळे त्यांच्याविरुध्द अटक वॉरंट काढले जाऊ शकत नाही. याउलट, हुकूमनामाधारकाचे विद्वान वकीलांनी युक्तीवाद केला की, महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम, १९६० चे कलम–३६ अन्वये न्यायनिर्णीत ऋणको ही निगम संस्था असून तिचे सर्व अधिकारी तिच्या कृत्यास जबाबदार आहेत. सदरचा दावा हा संस्थेच्या चेअरमन विरुध्द दाखल केला होता. त्यामुळे रणजितसिंह मोहिते–पाटील यांच्याविरुध्द अटक वॉरंट काढण्यात यावे.

१०. सदरच्या परिस्थीतीमध्ये कायद्याची परिस्थीती काय आहे, हे पाहणे उचित होईल. दिवाणी प्रक्रिया संहितेचा, क्रम–२१, नियम–३७ असा आहे की,

(१) या नियमांमध्ये काहीही अंतर्भुत असले तरी, जेव्हा न्यायनिर्णीत ऋणकोला अटक करुन आणि त्याला दिवाणी कारागृहात स्थानबध्द करुन त्याद्वारे पैशांचे प्रदान करण्याबाबतच्या हुकूमनाम्याची अंमलबजावणी करण्याकरीता अर्ज दिलेला असून, त्यानुसार, न्यायनिर्णीत ऋणको अटक होण्यास पात्र असेल तेव्हा, न्यायालय त्याच्या अटकेचे वॉरंट काढण्याऐवजी, एक नोटीस काढून, तीत विनिर्दिष्ट करण्यात येईल अशा दिवशी त्याने न्यायालयासमोर उपस्थित व्हावे आणि त्याला दिवाणी कारागृहात

का पाठविण्यात येऊ नये यासंबंधी कारण दाखवावे असे त्यास [फर्मावील]:

[परंतु, न्यायनिर्णीत ऋणको फरारी होण्याची किंवा तो न्यायालयाच्या स्थानिक सिमांच्या बाहेर जाण्याची शक्यता असून त्यामागे हुकूमनाम्याच्या अंमलबजावणीस विलंब लावण्याचा उद्देश आहे किंवा परिणामी तसे घडणार आहे अशी शपथपत्राद्वारे किंवा अन्यप्रकारे न्यायालयाची खात्री पटविल्यास अशा नोटिशीची आवश्यकता भासणार नाही.]

(२) न्यायनिर्णीत ऋणको नोटिशीला अनुसरुन उपस्थित झाला नसेल त्याबाबतीत, हुकूमनामाधारकाने तशी मागणी केली तर, न्यायालय, न्यायनिर्णीत ऋणकोच्या अटकेचे वॉरंट काढील.

११. तसेच दिवाणी प्रक्रिया संहितेचा, क्रम–२१, नियम–४१ असा आहे की,

[(१)] हुकूमनामा पैशांच्या प्रदानाकरीता असेल त्याबाबतीत, हुकूमनामाधारकास

(अ) न्यायनिर्णीत ऋणको, किंवा

(ब) न्यायनिर्णीत ऋणको हा एखादा निगम असेल तेव्हा] त्याचा कोणताही अधिकारी, किंवा

(क) अन्य कोणत्याही व्यक्ती,

यांची न्यायनिर्णीत ऋणकोला काही कर्जे फेडावयाची आहेत काय आणि असल्यास कोणती आणि हुकूमनाम्याची पुर्तता करण्यासाठी न्यायनिर्णीत ऋणकोकडे अन्य काही मालमत्ता किंवा साधनसंपत्ती आहे का? आणि असल्यास कोणती? यासंबंधी तोंडी तपासणी करण्यात यावी असा आदेश मिळविण्याकरीता न्यायालयाकडे अर्ज करता येईल, आणि न्यायालय, अशा न्यायनिर्णीत ऋणकोने किंवा अधिक–याने किंवा अन्य व्यक्तीने हजर राहावे व त्याची तपासणी केली जावी

याकरीता व कोणत्याही वहया किंवा दस्तऐवज सादर करण्याकरीता आदेश काढू शकेल.

[(२)] पैशांच्या प्रदानाकरीता काढलेल्या हुकूमनाम्याची तीस दिवसांच्या कालावधीपर्यंत पुर्तता व्हावयाची राहिली असेल, तेव्हा न्यायालय, हुकूमनामाधारकाच्या अर्जावरुन पोटनियम (१) खालील आपल्या शक्तीस बाध न येऊ देता, न्यायनिर्णीत ऋणकोला किंवा न्यायनिर्णीत ऋणको हा एखादा निगम असेल तर, त्याच्या कोणत्याही अधिका–याला, त्याने न्यायनिर्णीत ऋणकोच्या भत्त्यांचा तपशिल नमूद करणारे शपथपत्र करुन द्यावे असे फर्मावू शकेल.

(३) पोटनियम (२) खाली काढलेल्या कोणत्याही आदेशाची अवज्ञा झाल्यास, आदेश काढणारे न्यायालय किंवा ज्यांच्याकडे कार्यवाही वर्ग झाली असेल, असे कोणतेही न्यायालय, आदेशाची अवज्ञा करणा–या व्यक्तिला जास्तीत जास्त तीन महिन्यांच्या मुदतीपर्यंत दिवाणी कारागृहात स्थानबध्द करुन ठेवावे असा आदेश देऊ शकेल. मात्र, अशी मुदत संपण्यापूर्वी न्यायालयाने त्या व्यक्तिला मुक्त करण्याचा निर्देश दिला तर गोष्ट वेगळी.]

१२. सदरचे प्रकरणातील हुकूमनामा हा शंकर सहकारी साखर कारखाना लिमिटेड, सदाशिवनगर यांच्या विरुध्दचा आहे. थोडक्यात सदरच्या साखर कारखान्याविरुध्द सदरचा हुकूमनामा आहे. सदरचा हुकूमनामा हा रणजितसिंह मोहिते–पाटील यांच्याविरुध्द वैयक्तीक झालेला नाही. रणजितसिंह मोहिते–पाटील हे सदरचे कारखान्याचे अध्यक्ष आहेत. त्यामुळे ते न्यायनिर्णीत ऋणको नाहीत. दिवाणी प्रक्रिया संहितामध्ये अशी कोठेही तरतुद नाही की, पैशांच्या प्रदानाच्या

हुकूमनाम्याच्या अंमलबजावणीसाठी कारखान्याच्या किंवा निगमच्या कर्मचा–यांना, संचालकांना किंवा जनरल मॅनेजर यांना अटक करुन तुरुंगात ठेवता येईल.

१३. दिवाणी प्रक्रिया संहिताचे, क्रम–२१, नियम–४१ अन्वये ज्यावेळी पैशांच्या प्रदानाचा हुकूमनाम्यातील न्यायनिर्णीत ऋणको हा निगम किंवा संस्था असते त्यावेळी हुकूमनामाधारक हा न्यायालयाकडे अर्ज करुन सदरच्या संस्थेच्या अधिका–यास तोंडी तपासणीसाठी बोलावू शकतो व त्यामध्ये न्यायनिर्णीत ऋणकोला काही कर्ज फेडायची आहेत काय आणि असल्यास कोणती आणि हुकूमनाम्याची पुर्तता करण्यासाठी न्यायनिर्णीत ऋणकोकडे अन्य काही मालमत्ता किंवा साधनसंपती आहे का आणि असल्यास कोणती, याबाबतची माहिती मिळवू शकतो. थोडक्यात रक्कम वसुलीच्या प्रकरणात ज्यावेळी न्यायनिर्णीत ऋणको हा एखादा निगम किंवा संस्था असतो त्यावेळी हुकूमनामाधारक हा सदरच्या निगम किंवा संस्थेच्या कर्मचा–यांना किंवा संचालकांना हुकूमनाम्याची अंमलबजावणी करण्यासाठी अटक करुन तुरुंगात ठेवण्याची मागणी करु शकत नाही. सदरचे मुद्द्याचे प्रित्यर्थ मी ''धनुष विर सिंग विरुध्द डॉ.इला शर्मा आणि इतर, २०२४ अलाहाबाद उच्च न्यायालय, ११३९३१ **(मा.अलाहाबाद उच्च न्यायालय)''**, या अधिनिर्णयाचा आधार घेत आहे. सदरचे अधिनिर्णयात मा.अलाहाबाद उच्च न्यायालयाने निर्वाळा दिला आहे की, ज्यावेळी पैशांच्या प्रदानाचा हुकूमनामा हा निगम, संस्था किंवा कंपनी यांच्याविरुध्द पारित केलेला असतो त्यावेळी तो कोणत्याही व्यक्तीविरुध्द म्हणजेच कर्मचारी, अधिकारी किंवा संचालक यांच्याविरुध्द त्यांना अटक करुन तुरुंगात ठेवून त्याची अंमलबजावणी करता येत नाही. त्यांच्याविरुध्द दिवाणी प्रक्रिया संहितेचे, क्रम–२१, नियम–३८ अन्वये अटक वॉरंट काढता येत नाही.

१४. हुकूमनामाधारक हा सदरच्या व्यक्तीना अटक वॉरंट काढण्याचे सोडून

इतर मार्गाने हुकूमनाम्याची अंमलबजावणी करु शकतो. सदरचे वर नमुद केलेल्या अधिनिर्णयातील प्रमाण सदरचे प्रकरणात लागु होत आहे. रणजितसिंह मोहिते–पाटील हे शंकर सहकारी साखर कारखाना लिमिटेड, सदाशिवनगर याचे अध्यक्ष आहेत. त्यामुळे त्यांच्या वैयक्तीक कक्षेत त्यांना अटक वॉरंट काढता येणार नाही. तसेच मी वर नमुद केल्याप्रमाणे, रणजितसिंह मोहिते–पाटील यांनी न्यायालयाच्या हुकूमाची अवज्ञा केलेली नाही. त्यामुळे त्यांना दिवाणी तुरुंगात ठेवण्यासाठी अटक वॉरंट काढता येणार नाही. मी न्यायनिर्णीत ऋणको यांच्यामार्फत दाखल करण्यात आलेले अधिनिर्णय **"ललीतकुमार (पश्चात्त)", "युनियन ऑफ इंडिया (पश्चात्त)" व "शांताराम (पश्चात्त)"** वाचून पाहिले. सदरचे अधिनिर्णयातील तथ्य व सदरचे प्रकरणातील तथ्य भिन्न असल्यामुळे सदरचे अधिनिर्णयातील प्रमाण सदरचे प्रकरणास लागु होत नाहीत. मी वर नमुद केल्याप्रमाणे, रणजितसिंह मोहिते–पाटील हे वैयक्तीकपणे न्यायनिर्णीत ऋणको नाहीत. तसेच त्यांनी न्यायालयाच्या आदेशाची अवज्ञा केलेली नाही. त्यामुळे सदरचा अर्ज नामंजूर होण्यास पात्र आहे. म्हणून मी मुद्दा क्र.१ चे उत्तर ''नकारार्थी'' नोंदवित आहे.

## मुद्दा क्र. २ बाबत

१५. मी वर नमुद केल्याप्रमाणे सदरचा अर्ज नामंजूर करणे आवश्यक आहे. म्हणुन मी मुद्दा क्र. २ चे उत्तरासाठी खालील अंतिम आदेश पारीत करीत आहे.

## आदेश

सदरचा निशाणी क्र.२४ चा अर्ज नामंजूर करण्यात येत आहे.

Digitally signed by GHANWAT SOPAN DASHRATH
Date: 2025.09.03 15:15:32 +0530

दि.०२/०९/२०२५.

(सो.द.घनवट)
दिवाणी न्यायाधीश वरिष्ठ स्तर,
माळशिरस.

स्पेशल **दरखास्त**

**क्र.२५/२०२४(नि.२४)**

**शेरा**

मी शपथेवर सांगतो की, या पी.डी.एफ. आदेश फाईल मधील मजकूर हा मूळ आदेशातील मजकूराशी शब्द न शब्द सारखा आहे.

लघुलेखकाचे नाव – श्री.म.पां.सदाफुले.

कोर्टाचे नाव – दि. न्या. व. स्तर, माळशिरस.

न्यायनिर्णयाचा मजकूर सांगितल्याचा दिनांक– ०२/०९/२०२५.

न्यायनिर्णय टंकलिखित केलेला दिनांक – ०२/०९/२०२५.

न्यायनिर्णय स्वाक्षरीत केल्याचा दिनांक – ०२/०९/२०२५.

न्यायनिर्णय अपलोड केल्याचा दिनांक – ०३/०९/२०२५.

स्वाक्षरीत/–

दि.०३/०९/२०२५.

(श्री.म.पां.सदाफुले)

लघुलेखक ग्रेड – २,

दिवाणी न्यायालय, वरिष्ठ स्तर, माळशिरस.